लोकमत

## शिक्षक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचेनातच : शाळा बंद तर शिक्षणही बंद, शासनाच्या उद्देशाला हरताळ

# ३२ हजार शिक्षक असतानाही ४२ हजार विद्यार्थी शिक्षणापासून वंचित

लोकमत न्यूज नेटवर्क

अहमदनगर : कोरोनाच्या काळात एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये या उद्देशाने शिक्षण विभागाने 'शाळा बंद शिक्षण मात्र सुरु' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना येनकेन मार्गाने शिक्षण देण्याची धडपड केली, मात्र काही शिक्षकांच्या इच्छाशक्तीअभावी जिल्ह्यात तब्बल ४२ हजार विद्यार्थी अद्यापही शिक्षणापासून वंचित राहिले आहेत. विशेष म्हणजे जिल्ह्यात शिक्षकांची संख्या ३२ हजार एवढी प्रचंड असतानाही हे घडले आहे.

कोरोनाच्या काळात शाळा बंद असल्याने शासनाने ऑनलाईन शिक्षण देण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या व शहरी भागात महानगरपालिकेच्या, तसेच इतर सर्वच खासगी शाळांतील शिक्षक विद्यार्थ्यांना ऑनलाईन धडे देत आहेत.

तर दुसरीकडे ऑनलाईन शिक्षणाची साधने नसल्यास संबंधित शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी ऑफलाईन शिक्षणाची सोय करावी असे शासनाने म्हटले आहे. परंतु याची अंमलबजावणी होत नसल्याने जिल्ह्यातील तब्बल ४२ हजार ७२८ विद्यार्थी अद्यापही शिक्षणापासून अलिप्त राहिले आहेत. शिक्षण विभागाच्या अहवालातूनच ही आकडेवारी स्पष्ट झालेली आहे.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, म्हणून शिक्षकांनी प्रथम ऑनलाईन शिक्षण सुरु राहण्याच्या अनुषंगाने कार्यरत राहायचे असल्याच्या सूचना शिक्षण विभागाने दिल्या. परंतु ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांकडे ऑनलाईन शिक्षणासाठी आवश्यक असणारे मोबाईल, टीव्ही किंवा रेडिओ यापैकी कोणतेही साधन नाही. ही मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून त्यांना आठ-पंधरा दिवसांचा अभ्यास लिहून (हार्डकॉपी) द्यावी, विद्यार्थी-पालक यांच्यासोबत दूरध्वनीद्वारे संपर्क साधून त्यांना अभ्यासक्रम द्यावा, जमलं तर स्वयंसेवक नेमून त्यांच्याकरवी अभ्यास द्यावा. हेही शक्य नसेल तर प्रत्यक्ष शाळेत जाऊन विद्यार्थ्यांचे गट करून शिक्षण द्यावे असे शिक्षण विभागाने शिक्षकांना स्पष्ट बजावले आहे.

जिल्ह्यात जिल्हा परिषद शाळांचे ११ हजार ५२९, तर इतर व्यवस्थापन शाळांचे २० हजार ६२३ असे एकूण ३२ हजार १५२ शिक्षक आहेत. एवढे शिक्षक असतानाही तब्बल ४२ हजार विद्यार्थी शिक्षणापासून वंचित कसे राहिले असा प्रश्न आता सर्वांनाच पडला आहे.

### शिक्षकांना का नकोय शाळा

गरज असेल तेव्हा शिक्षकांनी शाळेत जाऊन विद्यार्थ्यांचे गट करत अध्यापन करावे असे शिक्षण विभागाने स्पष्ट म्हटले आहे. याशिवाय जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीच्या बैठकीतही १०० टक्के शिक्षकांनी शाळेत उपस्थित राहावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत. एवढे सगळे होऊनही शिक्षक शाळेत हजर का राहत नाहीत हा प्रश्न आहे. काही शिक्षक संघटनांनी तर प्रत्यक्ष शिक्षण विभागात येऊन सर्व शिक्षकांना शाळेत बोलावू नये असे निवेदनच दिले आहे. यावरही आश्चर्य व्यक्त होत आहे.

लोकमत

**जिल्ह्यात सध्या ८० केअर सेंटर : दीड हजारांच्यावर बेड शिल्लक, रोज सापडत आहेत सरासरी ३०० रुग्ण**

# १२ कोविड सेंटरमध्ये कोरोना रुग्णांची संख्या शून्यावर

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहमदनगर:** जिल्ह्यात शासकीय २८ आणि ५२ खासगी कोविड सेंटर असे एकूण ८० कोविड सेंटर सध्या कार्यरत आहेत. त्यातील नगर शहरातील १२ खासगी कोविड सेंटरमध्ये कोरोनाचे रुग्णच नसल्याने ते सध्या बंद करण्यात आले आहेत. जिल्ह्यात कोरोनाच्या रुग्णांचे बरे होण्याचे प्रमाण ९५ टक्के इतके झाले आहे.



## जिल्ह्यात शासकीय कोविड केअर सेंटर | अहमदनगर 80




## कोविड सेंटरचा आढावा




### सरासरी रुग्ण संख्येत घट

जिल्ह्यात यापूर्वी रोज सरासरी सातशे रुग्ण आढळून येत होते. त्यामध्ये आता घट झाली असून सध्या सरासरी तीनशे रुग्ण आढळून येत आहेत. बरे होण्याचे जिल्ह्यातील प्रमाण हे दोन महिन्यापूर्वी ८० टक्के होते, ते आता ९५ टक्क्यांपर्यंत पोहचले आहे. तसेच बाधित झालेल्यांपैकी तब्बल ९५ टक्के रुग्णांना कोरोनाची कोणतीही लक्षणे आढळून आली नाहीत, असे जिल्हा आरोग्य यंत्रणेने सांगितले. त्यामुळे बरे होण्याचे प्रमाण हे वाढले आहे.

### दीड हजार बेड शिल्लक

शासकीयसह खासगी कोविड सेंटरमध्ये दीड हजारांपेक्षा जास्त बेड शिल्लक आहेत. कोरोनाच्या रुग्णांची संख्या कमी झाली आहे. बरे होणाऱ्यांचे प्रमाणही वाढत आहे. कोरोनाबाधित रुग्णांना लक्षणे नसल्याने ते पाच दिवसांत बरे होत आहेत. सध्या ऑक्सिजन, व्हेंटिलेटर असलेल्या बेडसाठीची मागणी घटली आहे.

जिल्ह्यात शासकीय कोविड सेंटरची संख्या २५ च्या वर आहे. नगर शहरातील १० ते १२ खासगी कोविड सेंटरमध्ये सध्या कोरोनाचे रुग्णच येत नाहीत. त्यामुळे ते सध्या कायान्वीत नाहीत. कोविड सेंटर बंद करण्याबाबत अद्याप एकाही खासगी हॉस्पिटलने परवानगी घेतलेली नाही. रुग्ण वाढले तर पुन्हा ते सुरू होऊ शकतील.

– डॉ. सुनील पोखरणा, जिल्हा शल्य चिकित्सक

# नगरमधील रूग्णालयांमधून करोनाचा काढता पाय

## सक्रिय रुग्णसंख्येत घट; ५० हजार ठणठणीत

**नगर, दि. १७ (प्रतिनिधी)** - जिल्ह्यात आज ४७५ रुग्णांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. आता बरे झालेल्या रुग्णांची एकूण संख्या ४९ हजार ७१२ इतकी झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे जिल्ह्यातील प्रमाण हे आता ९४.१० टक्के इतके झाले आहे. त्यामुळे नगरमध्ये करोनाने रुग्णालयातून काढता पाय घेतल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

दरम्यान, काल (शुक्रवारी) सायंकाळी सहा वाजलेपासून आज सायंकाळी सहा वाजेपर्यंत रुग्णसंख्येत ३८५ ने वाढ झाली. यामुळे उपचार सुरू असणाऱ्या रुग्णांची संख्या आता २३१२ इतकी झाली आहे.

जिल्हा रुग्णालयाच्या करोना टेस्ट लॅबमध्ये ९३, खासगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत ११० आणि अँटिजेन चाचणीत १८२ रुग्ण बाधित आढळले. जिल्हा रुग्णालयाच्या करोना टेस्ट लॅबमध्ये बाधित आढळून आलेल्या रुग्णांमध्ये मनपा ४१, अकोले १७, जामखेड ४, कर्जत २, नगर ग्रामीण १, नेवासे १२, पारनेर ४, राहुरी ३, संगमनेर २, शेवगाव ३, श्रीरामपूर २, अशा रुग्णांचा समावेश आहे.

### नगर करोना अपडेट

बरे झालेली रुग्ण संख्या : **४९,७१२**

उपचार सुरू असलेले रुग्ण : **२,३१२**

आजपर्यंतचे मृत्यू : **८०३**

एकूण रुग्णसंख्या : **५२,८२७**



खासगी प्रयोगशाळेत केलेल्या तपासणीत बाधित आढळून आलेल्या ११० रुग्णांची नोंद एकूण रुग्णसंख्येत घेण्यात आली. यामध्ये, मनपा ३८, अकोले ५, जामखेड ३, कोपरगाव १, नगर ग्रामीण १४, नेवासे ३, पारनेर ६, पाथर्डी ५, राहाता १३, राहुरी ७, संगमनेर १०, शेवगाव ३, श्रीगोंदा १, श्रीरामपूर १, अशा रुग्णांचा समावेश ▶ पान २ वर...

# जिल्ह्यात कोरोनामुक्त होणाऱ्यांचे प्रमाण ९४ टक्के

**नगर :** जिल्ह्यात काल ३८५ नवीन कोरोना रुग्ण आढळून आले आहेत. ४७५ रुग्णांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. आता बरे झालेल्या रुग्णांची एकूण संख्या ४९ हजार ७१२ झाली. रुग्ण बरे होण्याचे जिल्ह्यातील प्रमाण ९४.१० टक्के झाले आहे, अशी माहिती जिल्हा नोडल अधिकारी डॉ. बापूसाहेब गाडे यांनी दिली.

जिल्हा रुग्णालयाच्या कोरोना टेस्ट लॅबमध्ये ९३, खासगी प्रयोगशाळेत ११० आणि अँटिजेन चाचणीत १८२ रुग्ण बाधित आढळले. जिल्हा रुग्णालयाच्या कोरोना टेस्ट लॅबमध्ये बाधित आढळून आलेल्या रुग्णामध्ये नगर शहर ४१, अकोले १७, जामखेड ४, कर्जत २, नगर ग्रामीण १, नेवासे १२, पारनेर ४, राहुरी ३, संगमनेर २, शेवगाव ३, श्रीरामपूर २ रुग्णांचा समावेश आहे.

जिल्ह्यातील कोरोनाबाधितांची एकूण संख्या ५२ हजार ८२७ झाली आहे. या पैकी ४९ हजार ७१२ रुग्ण बरे झाले आहेत. आतापर्यंत ८०३ रुग्णांचा मृत्यू झालेला आहे. दरम्यान, काल ४७५ रुग्णांना डिस्चार्ज मिळाला. या रुग्णांमध्ये नगर शहर १०६, अकोले २४, जामखेड २०, कर्जत २२, कोपरगाव १२, नगर ग्रामीण ३१, नेवासे २२, पारनेर १४, पाथर्डी ६८, राहाता ३१, राहुरी १८, संगमनेर ५०, शेवगाव ११, श्रीगोंदे १६, श्रीरामपूर २४, भिंगार ३, मिलिटरी हॉस्पिटल ३ रुग्णांचा समावेश आहे.

# संगमनेरातील ८० गावे कोरोनामुक्त

## रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९२ टक्के; तालुक्यातील ३५३९ रुग्ण बरे होऊन परतले घरी

**संगमनेर : पुढारी वृत्तसेवा**

शहरातील सर्व उपनगरांच्या बरोबर तालुक्याच्या ग्रामीण भागातील १७१ खेडेगावांपैकी जवळजवळ १५० खेडेगावात कोरोना जाऊन पोहचला आहे. मात्र, कोरोनाबाधित रुग्णसंख्या वाढण्यात अनेक चढउतार होत असले तरी आजपर्यंत शहर आणि तालुक्यातील ३८५६ रुग्णापैकी ३५३९ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. तालुक्यात ८० गावे कोरोनामुक्त झाले आहे. त्यामुळे तालुक्याचे रुग्ण बरे होण्याचे सरासरी प्रमाण तब्बल ९२ टक्क्यांवर जाऊन पोहोचले असल्यामुळे संगमनेरकरांना काही अंशी तरी दिलासा मिळत आहे.

संगमनेर शहर आणि तालुक्यात सर्व प्रथम एप्रिल महिन्यात तीन रुग्णापासून कोव्हिडचे संक्रमण होण्यास सुरुवात झाली. अवघ्या एकाच दिवसांत ८ मे रोजी ९ वरून तालुक्याची रुग्णसंख्या थेट १८ वर गेली. त्यानंतर रुग्णसंख्येत वाढ होण्याचा वग वाढतच राहिला. ३० मे रोजी रुग्णसंख्या ३५ वर जाऊन पोहोचली. तेरा दिवसांनंतर १२ जून रोजी तालुक्याची रुग्णसंख्या ३५ वरुन थेट ७० वर जाऊन पोहोचली. ५ जुलै रोजी ही रुग्णसंख्या सरळ १४० वर जाऊन पोहोचली. अवघ्या १० दिवसांतच १५ जुलै रोजी तालुका १४० वरून थेट २७९ वर पोहोचला. याच गतीने पुढील अकरा दिवसांतच २६ जुलैपर्यंत तालुक्याची रुग्णसंख्या २७९ वरून ५५८ तर १३ ऑगस्टपर्यंतच्या १८ दिवसांत १ हजार ११५ पर्यंत बाधितांचा आकडा पोहोचला. ऑगस्टपासून तालुक्यातील संक्रमितांची गती काहीशी वाढल्याचे निरीक्षणही या




आकडेवारीतून समोर आले.

दि. १४ ऑगस्ट ते १० सप्टेंबर या २८ दिवसांच्या कालावधीत सरासरी ४० रुग्ण दररोज, या गतीने २ हजार २३० रुग्णसंख्येपर्यंत मजल मारली. दि. ११ सप्टेंबरपासून आज अखेरपर्यंतच्या ३५ दिवसांचा विचार करता तालुक्याच्या रुग्णसंख्येत सरासरी ४७ रुग्णांची दररोज वाढ होत असून या कालावधीत १ हजार ६४८ रुग्णांची नव्याने भर पडून तालुका ३ हजार ८८६ रुग्णसंख्येवर पोहोचला आहे. रुग्णवाढीची हीच गती यापुढेही कायम राहिल्यास पुढील बारा ते पंधरा दिवसांतच संगमनेर तालुक्यातील बाधितांची संख्या साडेचार हजारांच्या पार जाण्याचा अंदाजही येवू शकतो.

दि. १३ ऑगस्टपासून १० सप्टेंबरपर्यंत तालुक्यातील रुग्णवाढीचा वेग प्रती दिवस ३९ रुग्ण असा होता. या २९ दिवसांच्या कालावधीत संगमनेर तालुक्याच्या एकूण रुग्णसंख्येत १ हजार १४२ रुग्णांची भर पडली. तर ११ सप्टेंबरपासून कालच्या १५ ऑक्टोबरपर्यंतच्या ३५ दिवसांत सरासरी दररोज ४७.०८ या वेगाने रुग्णसमोर आल्याने तालुक्याच्या रुग्णसंख्येत तब्बल १ हजार ६४८ नवीन बाधितांची भर पडली आहे.

ऑक्टोबर महिन्यातील आजपर्यंतच्या पंधरवड्याचा विचार करता या कालावधीत गुरुवारपर्यंत शहरी भागातील रुग्ण संख्येत दररोज ९ रुग्ण या सरासरीने १३७ रुग्णांची तर ग्रामीण क्षेत्रातून दररोज ३३ रुग्ण या गतीने तब्बल ४९८ कोरोनाबधित रुग्णांची नव्याने भर पडली आहे.

तालुक्यात दि. ३० सप्टेंबरपर्यंत १३० गावांपर्यंत कोविडचे संक्रमण पोहचले आहे. ऑक्टोबर महिन्यात तालुक्याचा जवळपास ८८ टक्के भाग कोरोनाने व्यापला आहे. सध्य स्थितीला शहरासह तालुक्याच्या ग्रामीण भागातील १५० गावांपर्यंत जाऊन पोहोचले आहे. शहर आणि ग्रामीण भाग मिळून एकूण वाढलेल्या रुग्णांच्या दररोजची सरासरी ४२.३३ रुग्ण प्रती दिवस अशी झाली आहे. मात्र, दिलासादायक गोष्ट म्हणजे रुग्ण बरे होण्याचे प्रमाण चांगले आहे.

### दिवाळीनंतर धोका वाढण्याची भीती

दिवाळी नंतरच्या कालावधीत थंडी वाढणार असल्याने कोविडच्या संक्रमणाची गती वाढण्याचीही शक्यता आहे. त्यासाठी नागरिकांनी मास्क शिवाय बाहेर फिरणे धोकादायक ठरणार असल्याचे वैद्यकीय क्षेत्रातील जाणकार सांगत आहेत. त्यासोबतचच नागरिकांनी सामाजिक अंतर व वारंवार हात धुण्याची सवय कायम ठेवल्यास वाढत्या रुग्णसंख्येवरही नियंत्रण मिळवता येणे शक्य आहे. त्यामुळे नागरिकांनी नियमांचे तंतोतंत पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# होय, परीक्षेचे नियोजन चुकलेच

## उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे; विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही

**सकाळ वृत्तसेवा**

**राहुरी, ता. १७ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षेत गोंधळ झाला. विद्यार्थ्यांना झालेल्या मानसिक त्रासाची जाणीव आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ देणार नाही. कामात कुचराई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी दिली.**

राहुरी फॅक्टरी येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना मंत्री तनपुरे म्हणाले, ''कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अंतिम वर्षाची परीक्षा रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. मागील सत्रांत विद्यार्थ्यांना मिळालेल्या गुणांच्या आधारे सरासरी गुण देण्याचा निर्णय घेतला. ज्यांना गुणवाढीसाठी परीक्षा द्यायची असेल, त्यांची परीक्षा लॉकडाऊन उठल्यावर घेण्याची तयारी होती; मात्र, त्यास यूजीसीने मान्यता दिली नाही. काही जण न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयाने यूजीसीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचा आदेश दिला. त्यामुळे या परीक्षा घ्याव्या लागल्या.''



प्राजक्त तनपुरे

''परीक्षांचे नियंत्रण विद्यापीठांकडे असते. राज्य सरकार फक्त मार्गदर्शन करते. विविध अभ्यासक्रमांच्या पदवी व पदव्युत्तर अंतिम वर्षाच्या ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षेत सलग दोन दिवस गोंधळ उडाला. काही अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका परीक्षेच्या वेळेत महाविद्यालयांत पोचल्या नाहीत. मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या प्रश्नपत्रिका मिळाल्या. त्यामुळे काही विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिका सोडविल्या नाहीत. काही अभ्यासक्रमांचे, काही विषयांचे पेपर रद्द झाले. दिवसभर महाविद्यालयात बसून, काही विद्यार्थ्यांना परीक्षा न देता माघारी परतावे लागले. अशा विविध कारणांमुळे विद्यार्थ्यांना मानसिक त्रास झाला,'' असे ते म्हणाले.

'सकाळ'मधील बातम्यांमुळे वस्तुनिष्ठ माहिती समजल्याचे सांगून, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ देणार नाही. त्यांना पुन्हा पेपरची संधी दिली जाईल. कामात कुचराई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे मंत्री तनपुरे यांनी स्पष्ट केले. या वेळी सुरेश वाबळे, काका कोयटे, शिवाजी कपाळे, नामदेव ढोकणे, श्यामराव निमसे, डी. बी. जगताप, सुरेंद्र थोरात आदी उपस्थित होते.

# कोरोनावर ४७५ जणांची मात

**नगर, ता. १७ :** जिल्ह्यात आज दिवसभरात ४७५ रुग्णांनी कोरोनावर मात केली. आजअखेर बरे झालेल्या रुग्णांची संख्या ४९ हजार ७१२ झाली. रुग्ण बरे होण्याचा टक्का ९४.१० आहे.

मागील महिन्याच्या तुलनेत सध्या कोरोनाबाधित सापडण्याचे प्रमाण कमी झाले आहे. गेल्या दोन दिवसांपासून हा आकडा पाचशेच्या आत आला आहे. रुग्णसंख्या कमी झाली असली, तरी प्रत्येकाने काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. मागील चोवीस तासांत फक्त ३८५ कोरोनाबाधित आढळून आले. आजअखेर बाधितांची संख्या ५२ हजार ८२७ झाली असून, त्यातील ८०३ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. सध्या २२१२ रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

जिल्हा रुग्णालयातील तपासणी अहवालात ९३ बाधित आढळले. त्यात महापालिका हद्दीत ४१, अकोले १७, जामखेड चार, कर्जत दोन, नगर ग्रामीण एक, नेवासे १२, पारनेर चार, राहुरी तीन, संगमनेर दोन, शेवगाव तीन, श्रीरामपूरमध्ये दोन रुग्ण आहेत.

खासगी प्रयोगशाळेतील तपासणीत ११० बाधित आढळले. त्यात महापालिका हद्दीत ३८, अकोले पाच, जामखेड तीन, कोपरगाव एक, नगर ग्रामीण १४, नेवासे तीन, पारनेर सहा, पाथर्डी पाच, राहाता १२, राहुरी सात, संगमनेर दहा, शेवगाव तीन, श्रीगोंदे एक व श्रीरामपूरमधील एक रुग्ण आहे.

अँटीजेन चाचणीत १८२ बाधित आढळले. त्यात महापालिका हद्दीत १२, अकोले २२, जामखेड ११, कर्जत १५, पारनेरे पाच, कोपरगाव सहा, नगर ग्रामीण चार, नेवासे दहा, पाथर्डी १६, राहाता १३, राहुरी दोन, संगमनेर २१, शेवगाव २३, श्रीगोंदे नऊ, श्रीरामपूरमधील १३ रुग्णांचा समावेश आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील ४७५ रुग्णांनी कोरोनावर मात केली. त्यात महापालिका हद्दीत १०६, अकोले २४, जामखेड २०, कर्जत २२, कोपरगाव १२, नगर ग्रामीण ३१, नेवासे २२, पारनेर १४, पाथर्डी ६८, राहाता ३१, राहुरी १८, संगमनेर ५०, शेवगाव ११, श्रीगोंदे १६, श्रीरामपूर २४, कॅन्टोन्मेंट तीन व मिलिटरी हॉस्पिटलमधील तिघांचा समावेश आहे.